# अशी माणसं–अशी साहसं

(संकटांशी दोन हात करणाऱ्या माणसांच्या सत्यकथा)

विलास फडके

रिया पब्लिकेशन्स्

**अशी माणसं–अशी साहसं : विलास फडके**

© **विलास फडके**

हनुमान आळी, वा. ब. फडके मार्ग,
मु.पो. पेण, जि. रायगड – ४०२ १०७
मोबा. : ९४२११७०११५

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब–३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ४००/–

यांच्या सौजन्याने...

श्री. आनंद अंतरकर

श्री. राजेंद्र कुलकर्णी

श्री. बशीर मुजावर

सौ. शीतल करदेकर

# कथानुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| १. | हेरॉइन रोडवरची शिकार | ... | ७ |
| २. | आकाशवेध | ... | ३५ |
| ३. | बंध काटेरी | ... | ५३ |
| ४. | तसू तसूवर चाले संगर | ... | ८९ |
| ५. | शॅकल्टनची चित्तथरारक सफर | ... | १२४ |
| ६. | योद्धा शिक्षक | ... | १४५ |
| ७. | एक पाऊल पुढेच | ... | १७२ |
| ८. | मरणवाटेनं | ... | १९८ |
| ९. | सागरी दिव्य | ... | २२५ |
| १०. | उलटलेल्या बोटीत | ... | २५८ |
| ११. | दिवाभीत | ... | २८७ |
| १२. | दोघांचे भांडण तिसऱ्यास त्रास | ... | ३०६ |
| १३. | हरवलेलं माणिक | ... | ३२३ |

१४. दुहेरी डाव ... ३५६

१५. नौदलाचा करार ... ३६८

*(वरीलपैकी १ ते १० क्रमांकाच्या कथा या सत्यकथा असून ११ ते १५ कथा या शेरलॉक होम्स व हर्क्युल पायरो यांच्यावरील रूपांतरीत कथा आहेत.)*

■■■

# हेरॉइन रोडवरची शिकार

तेहतीस वर्षांचा एडवर्ड मॅडोना अमेरिकेच्या 'ड्रग एन्फोर्समेंट ॲडमिनिस्ट्रेशन'मध्ये ('DEA') स्पेशल एजंट म्हणून काम करत होता. आज रविवार होता आणि आतापर्यंत तरी त्याला आपल्या बागेत निर्विघ्नपणे काम करता आलं होतं. उरलेला दिवसही असाच जाऊ दे म्हणून तो मनातल्या मनात प्रार्थना करत होता, पण दुपारचे बारा वाजून काही मिनिटं झाली आणि त्यानं पट्ट्याला अडकवलेला पेजर 'ब्लीऽप ब्लीऽप' करू लागला. तारीख होती २३ जून, १९८५. काम थांबवून तो घरात गेला. ऑफिसचा नंबर फिरवला आणि दाणकन रिसिव्हर खाली ठेवला.

''कस्टमवाल्यांनी टोकियोहून आलेल्या दोघांना बाहेरून ड्रग्ज आणल्याबद्दल अडकवून ठेवलं आहे !'' मॅडोना आपल्या पत्नीला म्हणाला, ''पाच-दहा ग्रॅम हेरॉइन असेल झालं !''

तासाभरानं स्पेशल एजंट मॅडोना विमानतळावर पोहोचला. तिथे कस्टम अधिकारी एकशे अडतीस आइस बकेट्सना भोकं पाडण्यात गुंतले होते. दोघा प्रवाशांनी बकेट्स नमुने म्हणून आणल्या असल्याचं सांगितलं. साऱ्या बकेट्सना भोकं पाडल्यानंतर त्यांच्या पोकळीतून एकूण एकशे शहाण्णव किलो शुद्ध हेरॉइन निघालं. पूर्व आशियातून अमेरिकेत आलेला आणि पकडलेला हा सर्वात मोठा साठा.

मॅडोनाला आणखी एक वाईट बातमीपण समजली. तो येण्यापूर्वी दोन प्रवाशांपैकी एकाला त्याच्या विनंतीवरून पोलीस बंदोबस्तात स्वच्छतागृहात पाठवलं होतं. तो हाँगकाँग चिनी होता. अंगानं सडपातळ, ओठांवर पातळ मिशी असं त्याचं स्वरूप होतं. त्यानं आपलं नाव फँग हॅन शेंग असल्याचं सांगितलं होतं. काही मिनिटं

झाली तरी तो बाहेर पडला नाही म्हणून इन्स्पेक्टर्स आत गेले तेव्हा फरशीवर खोट्या मिशा लोळत असलेल्या आढळल्या. वरची छोटीशी खिडकी उघडी होती, त्यातून पक्षी उडून गेला होता.

दुसऱ्या प्रवाशाला मग कडेकोट बंदोबस्तात ठेवण्यात आलं. तो आपण इलेक्ट्रिकल इंजिनिअर आहोत व व्यवसायानिमित्त इथे आलो आहोत असं सांगत होता.

''मला या हेरॉइनबद्दल काहीच माहीत नाही !'' तो इंग्लिशमध्ये पण अडखळत बोलत होता. ''मी एका मित्रासाठी या आइस बकेटस् घेऊन आलो. तिथे पोहोचल्यावर मला फोन येणार आहे.''

स्पेशल एजंट मॅडोनानं आपल्याला एकट्याला संशयिताबरोबर राहू द्यावं अशी कस्टम इन्स्पेक्टर्सना विनंती केली व त्यांनीही ती मान्य केली. त्यानं प्रवाशाचा पासपोर्ट तपासला.

''एकूण तू चेन त्संग मिंग आहेस तर?'' तो म्हणाला.

समोरचा इसम वयानं तिशीच्या आसपास होता. उंचीनं ठेंगू आणि अंगानं सडपातळ पण पिळदार.

''होय !'' तो म्हणाला, ''माझं नाव टॉमी चेन.'' त्याच्या कपाळावर आता घाम फुटू लागलेला दिसत होता.

मॅडोना पूर्वी पोलीस सार्जंट म्हणून काम करत होता. तो आठच महिन्यांपूर्वी डीइएमध्ये दाखल झाला होता. अमली पदार्थविरोधी लढ्यात आपण क्रांती घडवून आणू असं त्याचं स्वप्न होतं; पण आतापर्यंत कोकेन आणि हशिशच्या किरकोळ तपासाखेरीज काहीच करायला मिळालं नव्हतं. समोरचा प्रवासी चांगलाच घाबरलेला दिसत होता, पण कुणाला?

''शांत हो टॉमी.'' मॅडोना म्हणाला. ''तुला कुणालाही घाबरण्याचं कारण नाही. या आइस बकेटस्नी मोठीच डोकेदुखी निर्माण केली आहे. मला तरी त्यावर एकच उपाय दिसतो.''

मॅडोनानं सुचवलं, ''चेन अजूनही शिकागोला जाऊन बकेट्सची डिलीव्हरी देऊ शकत होता. त्यानं डिलीव्हरी घेणाऱ्याला ओळखलं आणि पोलिसांच्या बाजूनं साक्ष दिली तर त्याचा वीस वर्षांचा तुरुंगवास वाचला असता.''



''नाही, मी तसं करू शकत नाही !'' चेन मान हलवीत बोलला.

मॅडोनानं त्याच्यावर एक जळजळीत कटाक्ष टाकला. त्याच्यापुढे दुसरा कुठलाही पर्याय नसल्याचं वारंवार सांगितलं. अखेर चेन शिकागोला जाऊन सांगितल्याप्रमाणे अपेक्षित गिऱ्हाइकाची वाट बघण्यास तयार झाला. साक्ष देण्याचं मात्र त्यानं नाकारलं.

''ते मला आणि माझ्या घरच्या माणसांना ठार मारतील !'' तो म्हणाला.

''कोण ते?'' मॅडोनानं विचारलं. यावर चेननं काहीच उत्तर दिलं नाही.

आणखी दोन तासात मॅडोना आणि चेन विमानानं शिकागोला निघाले. चेनला पूर्वी देण्यात आलेल्या सूचनांप्रमाणे दोघेही विमानतळावरच्या हिल्टन हॉटेलमध्ये उतरले. तीन डीइए एजंटस् व्हरांड्यात पहाऱ्यावर बसले. एक चेनवर नजर ठेवण्यासाठी त्याच्याच खोलीत राहिला, तर मॅडोना त्याच्या शेजारच्या रूममध्ये उतरला.

रात्री अकरा वाजण्यापूर्वी काही मिनिटं आधी मॅडोनाला फोन आला. तेवढ्यातच मॅडोनाला मोठा आवाज ऐकू आला. 'त्या खोलीत चला !' मॅडोना चेनच्या खोलीकडे धावत धावत ओरडला. सारे एजंटस्ही पाठोपाठ धावले पण चेन बेपत्ता झाला होता.

त्यानं बंद खिडकी उघडली होती आणि तिथून सहा मजले खाली असणाऱ्या कॉंक्रिटच्या छतावर उडी मारली होती आणि तिथून पुन्हा दोन मजले खाली असणाऱ्या रस्त्यावर ! नवलाची गोष्ट म्हणजे या धडपडीत तो वाचला होता. एवढंच नाही तर रात्रीच्या गोंधळात अदृश्यही झाला होता.

मॅडोनानं ताबडतोब पोलीस, हॉस्पिटल्स आणि वाहतूक नियंत्रण केंद्रे, बस, रेल्वे-स्टेशन्सना बिनतारी संदेश पाठवून चेनचं वर्णन कळवलं. त्याला आश्चर्य वाटत होतं की, सातव्या मजल्यावरून उडी मारण्यास उद्युक्त व्हावा एवढा चेन कुणाला घाबरत होता?

आणखी अर्ध्या तासाने बसस्टेशनवरून गस्त घालणाऱ्या एका पोलिसाला एक आशियाई न्यूयॉर्कला जाणाऱ्या बसमध्ये चढताना दिसला. त्याचे केस पिंजारलेले होते, अंगातून रक्त वाहात होतं, गुडघा मोडलेला दिसत होता व इतर बारीकसारीक जखमाही बऱ्याच दिसत होत्या. तरीसुद्धा हॉटेलजवळ टॅक्सी पकडून पळ काढण्यात तो यशस्वी झाला.

दुसऱ्या दिवशी मॅडोना हॉस्पिटलमध्ये त्याच्याजवळ बसला होता.

''वीस वर्षं म्हणजे काही थोडाथोडका काळ नाही टॉमी !'' तो म्हणाला. चेन शून्य नजरेनं भिंतीकडे बघत बसला होता. त्याचा निर्णय झाला होता. बोलण्यापेक्षा तुरुंगात जाणं त्याला पसंत होतं. त्याला कुणाची दहशत वाटत होती याविषयी मॅडोना फक्त अंदाजच करू शकत होता.

सीटसमधील आपल्या ऑफिसात बसून मॅडोना 'चेनचा पळ काढण्याचा प्रयत्न आणि त्यानं काहीही सांगण्यास दिलेला नकार' यावर आपला अहवाल लिहीत होता. हातात एकशे छत्तीस आइस बकेट्स, एकशे शहाण्णव किलो हेरॉइन आणि एक जखमी कैदी एवढं होतं; पण सुगावा मात्र कसलाच लागत नव्हता. हा साठा अनेक प्रकारातला एक आहे की, अनेक साठ्यांपैकी एक आहे, याविषयी मॅडोनाला काहीही अंदाज नव्हता आणि सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे तो कुणी पाठविला तेही कळत नव्हतं.

१९८५ सालचा उन्हाळा संपत आला तरीही टॉमी चेन गप्पच होता. मॅडोनानं त्याची तिकीटं आणि वैयक्तिक कागदपत्रं तपासून पाहिली. त्याच्याजवळ सापडलेले पत्ते, गिचमीड अक्षरात लिहिलेली नावं, फोन नंबर्स यांच्या फोटोकॉपीज काढून जगातील सर्व डीइए ऑफिसेसना पाठवल्या; पण त्यातून काहीही निष्पन्न झालं नाही. टॉमी चेन आणि फँग हॅन शेंगचं नावही कुणी ऐकलं नव्हतं. ड्रग्जची चोरटी आयात तर वाढतच होती.

पण तपासाचं काम अर्धवट सोडून मॅडोनाला चालणार नव्हतं. विमानतळावर जप्त केलेले कागदपत्र अभ्यासून त्यानं आपला अहवाल तयार केला. दोन चिनी पुरुष, बँकॉक किंवा टोकियोहून विमानानं आले. बरोबर धातूच्या आइस बकेट्स, हिल्टन हॉटेलवर मुक्काम ! त्यानंतर मॅडोनानं कस्टम विभागाकडून 'डाटा बुक' मागितलं.

अमेरिकेत येणाऱ्या प्रत्येकाला कस्टम्स व इमिग्रेशन फॉर्म्स भरावेच लागतात. नंतर त्याची नॅशनल नार्कोटिक्स बॉर्डर इंटरडिक्शनच्या (N.N.B.I.S.) संगणकाकडून छाननी केली जाते. आलेल्या दोघांशी मिळतेजुळते असे अहवाल (N.N.B.I.S.) कडून मिळतील का ?

हे काम अत्यंत कंटाळवाणं आहे याची त्याला कल्पना होती. हजारो इमिग्रेशन कार्डस् आणि कस्टम्स डिक्लेरेशन्स तपासावी लागणार होती; पण एन्‌एन्‌बीआयएस इंटेलिजन्स को-ऑर्डिनेटरनं हे काम आपण करू म्हणून सांगितलं.



ऑगस्ट अखेरीस N.N.B.I.S. नं मॅडोनाला कळविलं की, एकोणीस प्रवाशांचा तपशील त्याच्या अहवालातील माहितीशी मिळताजुळता आहे. त्याचबरोबर या माहितीचा काहीही उपयोग होणार नाही, कदाचित ते दोघे वेगळेच असू शकतील असंही सांगण्यात आलं.

सीटलमध्ये आपल्या कॉम्प्युटरजवळ बसून मॅडोना की प्रेस करत होता. N.N.B.I.S. कडून आलेला तपशील कॉम्प्युटरला फीड करण्यात आला होता. पडद्यावर एकेक नाव वर सरकताना दिसत होतं. माहिती एवढी तपशीलवार होती की, प्रत्येक प्रवाशाच्या येण्याजाण्याच्या तारखा, फ्लाइट नंबर, मूळ ठिकाण, अमेरिकेत राहण्याचा पत्ता इत्यादी तपशील तपासायला जवळजवळ एक तास लागला.

सर्व प्रोग्रॅम संपला तेव्हा मॅडोना आपल्या खुर्चीत ताठ बसून राहिला होता. त्यानं अंधारात केलेला वार वाया गेला नव्हता. प्रत्येक संशयिताच्या हालचालीत बरंच साधर्म्य होतं. बऱ्याच जणांच्या १९८३ नंतर डझनभर तरी फेऱ्या झाल्या होत्या. सर्वांजवळ आइस बकेट्स किंवा धातूचे डबे होते. त्यांचे वर्णन 'विक्रीसाठी नमुने' म्हणून दिलं होतं. त्यांचा अखेरचा मुक्काम न्यूयॉर्क शहरातील हिल्टन हॉटेलमध्ये असे.

फँग हॅन शेंगनं पूर्वी अशाच चार फेऱ्या केल्या होत्या. टॉमी चेननं त्याला अटक होण्यापूर्वी जेमतेम महिनाभर आधी अठ्ठ्याणव आइस बकेट्स आणल्या होत्या. दोघेही पूर्वी कॉम्प्युटरवर आढळलेल्या नावांपैकी काही जणांबरोबर आले होते. ते अतिपूर्वेच्या कानाकोपऱ्यातून आले होते.

मॅडोना सुन्न होऊन खुर्चीत टेकून बसला होता. एका फार मोठ्या आणि गुंतागुंतीच्या ड्रग्ज व्यवहाराचा शोध लागल्याचं N.N.B.I.S. नं पुरविलेल्या माहितीवरून स्पष्ट होत होतं. अखेर महिनाभरानंतर त्याला निश्चित दिशा सापडली होती.

मॅडोनानं कस्टमच्या आणि इमिग्रेशन विभागाला हे सर्व संशयित पुन्हा जातील-येतील तेव्हा त्यांच्यावर कडक लक्ष ठेवण्यास सांगितलं. त्यानंतर संशयितांनी हॉटेलमधून केलेल्या लाँग डिस्टन्स कॉल्सचा तपशील मागवला. हे कॉल हाँगकाँग आणि तैवानसारख्या दूरवरच्या ठिकाणी केलेले होते आणि त्यांची संख्याही अफाट होती.